REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें २.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष २ पुणें, बुधवार, तारीख २६ फेब्रुवारी, १९३६. अंक ९

दि मुकुंद इन्शुअरन्स कंपनी लिमिटेड, पुणें शहर.
[ अधिकृत भांडवल १००,००० रुपये ]
प्रत्येक शेअर किं. रु. १० फक्त प्रत्येक शेअर किं. रु. १० फक्त
गरीबांपासून श्रीमंतांपर्यंत प्रत्येकाची विमा कंपनी !
शेअरविक्री जोरांत सुरू झाली.
शेअर्स खपविणारे एजंटस मर्यादित. त्वरित अर्ज करा.
मॅनेजिंग एजंटस्—विष्णु मुकुंद आणि कं., पो. बॉ. नं. ४३.
२५६ सदाशिव, पेरूगेटाजवळ, पुणें शहर.

FOR
SAFETY, ECONOMY
AND
DURABILITY
Consult
V. G. & Sons
ELECTRICAL and RADIO ENGINEERS
AND
LICENSED ELECTRICAL CONTRACTORS
Laxmi Road, Ganapati Chowk, POONA.

डॉन ऑफ इंडिया विमा कं. लि., पुणें
मध्यम वर्गांतील गृहेच्छू लोकांस अत्यंत उपयोगी, फायदेशीर व सहज सुलभसाध्य
भाडेकरी—घरमालक—गृहयोजना
माहितीपत्रक मागवा व विमेदार व्हा.
जनरल मॅनेजर

" दुसरें मूल्यमापन जाहीर झालें "
स्थापनेपासूनच भागीदारांना ६ टक्के फायदा व विमेदारांस वाढता नफा वांटून जुन्या व स्थिर झालेल्या कंपन्यांस कठीण असें अपूर्व यश संपादन केलेली पहिलीच महाराष्ट्रीय विमा कंपनी:—
कॉमनवेल्थ विमा कंपनी, लि. पुणें.
अध्यक्ष—श्री. न. चिं. केळकर, संचालक केसरी
हयातींतील विम्यास ३७॥ रु. | दुसऱ्या मूल्यमापनांत वांटलेला दर हजारीं त्रैवार्षिक नफा | हयातीनंतर विम्यास ४५ रु.
जास्त माहितीकरितां भेटा अगर समक्ष लिहा.
मॅनेजिंग एजन्ट्स.

न. वि. वडनेरकर
जव्हेरी आणि सराफ,
रविवार पेठ, सराफ
बझार, पुणें २.
आमच्याकडे सोनें, चांदी व मोत्यांचा माल खात्रीचा मिळेल. तसेंच जुन्या जिनसा योग्य भावानें खरेदी केल्या जातील.
शुभकार्यांत भेट देण्याकरितां सोन्याचांदीच्या नमुनेदार व सुबक वस्तु मिळतील.

# विविध माहिती

### प्रो. काळे ह्यांचें व्याख्यान

इंडिअन इन्स्टिटयूट ऑफ बँकर्सच्या पुणें शाखेच्या विद्यमाने गुरुवार, ता. २७ रोजीं ६॥ वाजतां गोखले हॉलमध्यें प्रो. काळे ह्यांचें "परराष्ट्रीय हुंडणावळ" या विषयावर इंग्रजींत व्याख्यान होणार आहे. जिज्ञासूंस व्याख्यानास येण्याची मोकळीक आहे, असें सेक्रेटरी कळवतात.

### मुंबई इलाख्यांतील फिल्म कंपन्या व स्टूडिओ

मुंबई इलाख्यांत सिनेमा फिल्म तयार करणाऱ्या एकूण ६१ कंपन्या आहेत, त्यांपैकीं ५४ मुंबई शहरांत असून, तीन पुण्यांत, तीन कोल्हापुरांत व एक नाशिक येथें आहे व एकूण फिल्म स्टूडिओ मात्र फक्त १९ आहेत, अशी माहिती प्रांतिक कायदे मंडळांत सांगण्यांत आली.

### कलकत्त्यांतील भिकारी

कलकत्ता शहरांत चार हजार भिक्षेकरी आहेत. त्यांपैकीं निम्मे भिकारी शरीरानें पुष्ट आहेत. उरलेल्यांत सुमारें एक हजार महारोगी व पांचशें आंधळे आहेत.

### मुंबई शहरांतील आत्महत्या

मुंबई शहरांत १९३५ सालीं एकूण १२९ लोकांनीं आत्महत्त्या केली. १९३४ सालीं १२० आत्महत्त्या झाल्या होत्या.

### ठेवी वाढल्या, परंतु रकमा गुंतविण्यास वाव नाहीं

दि बँक ऑफ इंडियाची वार्षिक सभा गेल्या आठवड्यांत भरली होती. त्या वेळीं बँकेचे अध्यक्ष, सर चुनीलाल मेहता, हे म्हणाले कीं, अहवालाचे सालीं ठेवींची रकम दीड कोटींनीं वाढली तरी कर्जाऊ दिलेल्या रकमेंत फक्त सदतीस लाखांचीच वाढ झाली. योग्य तारणावर फायदेशीर दरानें रकमा व्याजीं लावणें हल्ली इतकें पूर्वी कधींच कठीण झालें नव्हतें. बाजारांत भरपूर पैसा असल्याचा हा परिणाम होय. सोन्याची निर्गत होत आहे, त्याबद्दल मिळणाऱ्या रकमा ठेवींचे रूपानें जमा होतात. बँक ऑफ इंडियाच्या एक कोटि रुपये अधिकृत भांडवलापैकीं निम्में भांडवल वसूल झालेलें आहे.

### लंडन शहरांत धुकें पडल्यास किती नुकसान होतें ?

गेल्या आठवड्यांत सर्व इंग्लंडभर धुकें पडलें होतें, त्यामुळें विमानें, आगबोटी, आगगाड्या ह्या सर्वांची कशी आडकाठी झाली व अडीच तासपर्यंत लोकांची कशी गैरसोय झाली ह्याची माहिती वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झालेली आहे. अशा धुक्यामुळें होणाऱ्या नुकसानीची पैशांत किंमत किती होते ह्याचे आंकडे बरेच मनोरंजक आहेत:—लंडन शहराचा त्यामुळें दर दिवशीं सुमारें १½ कोटि रुपयांचा अपहार होतो. वहातुकीची कुचंबणा व भाड्यांची नुकसानी: ४० लक्ष रु., प्रकाश व उष्णता ह्यांसाठी जादा खर्च: ३६ लक्ष रु., मालाच्या ने-आणीस होणारी खोटी: २० लक्ष रु., आरोग्य व चीजवस्तु ह्यांची खराबी: १६ लक्ष रु., मजुरीच्या रकमेंत कपात: २० लक्ष रु. धुक्यांतून दिसूं शकेल, असें एक खिशांत मावणारें पेन्सिली एवढें यंत्र निघाल्यास लोकांची फार सोय होईल. आगबोटींना दहा मैलांपर्यंत दिसेल, अशी व्यवस्था असणारीं यंत्रें आज आहेतच.

### मुंबईचें अबकारी उत्पन्न

१९३४–३५ सालीं मुंबई सरकारच्या अबकारी खात्यास ३ कोटि १५ लक्ष रुपये उत्पन्न झालें.ह्यामध्यें सिंधमधील उत्पन्नाची रकम ( ३० लक्ष रु. ) धरलेली नाहीं. व्यवस्थेचा खर्च अनुक्रमें ४६ व ४ लक्ष रु. आला.

### ब्रिटिश इंडस्ट्रीज फेअर

मालाची प्रसिद्धि व खरेदी–विक्री मोठ्या प्रमाणावर होण्याचें ब्रिटिश इंडस्ट्रीज फेअर हें एक महत्त्वाचें ठिकाण आहे. यंदाच्या प्रदर्शनासाठी साम्राज्यांतील देशांच्या प्रतिनिधींप्रमाणें २८ साम्राज्येतर देशांतून खरेदीदार आले आहेत. प्रदर्शनाच्या पहिल्या दोन दिवसांतच मालाची खरेदी-विक्री प्रचंड प्रमाणावर झाली.

### एका वर्षांत २½ लक्ष रेडिओंची वाढ

ग्रेट-ब्रिटनमध्यें रेडिओ सेट्सचे लायसेन्स असलेले ७४ लक्ष लोक आहेत; म्हणजे इतक्यांचे जवळ रेडिओ सेट्स आहेत. एक वर्षापूर्वी हा आकडा २½ लाखांनीं कमी होता. रेडिओचे द्वारा, दर आठवड्यास, चांगल्या कार्याकरितां मदत मागण्यांत येते. गेल्या वर्षी ह्या मार्गानें १४ लाख रुपये जमा झाले.

### आगपेट्यांच्या धंद्यांतील प्रमुख राष्ट्रें

आगपेट्यांच्या व्यापारांत स्वीडन, रशिया व जपान हे देश अग्रेसर आहेत. त्या देशांतून १९३५ सालीं निर्गत झालेल्या आगपेट्यांचे आंकडे येथें दिले आहेत.

| देश | निर्गत |
|---|---|
| स्वीडन | ११,७८९ टन |
| जपान | ९,०१३ टन |
| रशिया | ५,४७२ टन |

### वहातुकीसाठी मालाची कुतरओढ

सिंधमध्यें सक्करचें धरण झाल्यापासून कित्येक लक्ष एकर जमीन नव्यानेंच लागवडीखालीं आली आहे. मुख्यतः कपास व गहू ह्यांची लागवड फारच वाढली आहे. ह्यापासून निघणाऱ्या पिकांच्या वहातुकीस विशेष महत्त्व प्राप्त झालें असून, हा माल कराची बंदरामार्फत बाहेर पडत असे, तो रेल्वे मार्गानें मुंबईकडे येईल, असें स्वस्त दर ठेवण्याचें धोरण रेल्वे बोर्ड आखीत असल्याची तक्रार आहे. सिंधमधील गव्हास कलकत्ता येथें चांगली मागणी येते. हा गहू रेल्वेनें आगला जावा, ह्यासाठी रेल्वेकडून विशेष सवलती दिल्या जातात. सरकारी सत्तेचा अशा रीतीनें उपयोग करण्यांत येऊं नये, प्रत्येक बंदरास योग्य तो वाव मिळणें जरूर आहे, अशा तऱ्हेचीं गाऱ्हाणीं पुढें मांडण्यांत आलीं आहेत.

### मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | रुपये किंमत |
|---|---|
| ता. १२ फेब्रुवारी रोजीं पुरा झालेला आठवडा, | ९२,९७,०८२ |
| ता. २२ फेब्रुवारी रोजीं पुरा झालेला आठवडा, | ३१,१२,२४२ |
| ता. २१ सप्टेंबर १९३१ ते २२ फेब्रुवारी १९३६ अखेर | २,३२,६४,७१,६४६ |

अनुक्रमणिका.

| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | १०२ |
| २ मुंबई इलाख्याचें बजेट | १०३ |
| ३ हिंदी रेल्वे बजेटांत पुनः तूट ... ... ... | १०४ |
| ४ स्फुट विचार... ... पैशाची वर्गावर्गी व सहकारी बँका–सहकारी शिक्षणासाठी सरकारची ग्रँट–हिशेब तपासनिसांचा दाखला–कॅलेंडर प्रदर्शन–स्कूल ऑफ कॉमर्सचें वार्षिक–नोकऱ्यांवर विदेशीयांच्या उड्या–हिंदी कोळसा व औद्योगिक प्रगति | १०५ |
| ५ सहकारी संस्थांच्या पैशाची वर्गावर्गी ... ... | १०७ |
| ६ इंग्लंडमध्यें आयुष्याच्या विम्याची वाढ ... | १०८ |
| ७ हिंदी चहाचा धंदा ... | १०९ |
| ८ ‘अर्था’ चें अभिनंदन | १०९ |
| ९ पंजाबमधील जमीन गहाणाच्या बँका ... | ११० |
| १० आंतरराष्ट्रीय कामगार परिषद ... ... | ११० |
| ११ निवडक बाजारभाव | १११ |
| १२ लखनौ येथील खादी व ग्रामोद्योग प्रदर्शन ... | १११ |

अर्थ

बुधवार, ता. २६ फेब्रुवारी, १९३६

## मुंबई इलाख्याचें बजेट

### सिंध विभक्तीकरणाचा फायदा

सिंध प्रांताचें विभक्तीकरण व स्वतंत्र नोंदणूक ही मुंबई इलाख्याच्या इतिहासांत घडून येणारी एक महत्त्वाची गोष्ट समजली पाहिजे. ह्यासंबंधांत पूर्वी काय चर्चा झाली आहे आणि सिंध प्रांत वेगळा होणें इष्ट आहे किंवा कसें ह्याचा विचार करण्याची वेळ आतां राहिलेली नाहीं. हिंदी राज्यघटनेच्या नव्या कायद्यांत सिंध स्वतंत्र प्रांत बनण्याची तरतूद करण्यांत आली असून त्यासंबंधांत हुकूम सुटला आहे, इतकेंच नाहीं, तर त्याच्या निराळ्या संसारास येत्या एप्रिलपासून, पूर्वतयारी म्हणून प्रारंभ व्हावा असेंहि निश्चित झालें आहे आणि प्रांतिक कायदेमंडळांत गेल्या सोमवारीं केलेल्या आपल्या भाषणांत गव्हर्नरसाहेबांनीं सिंधच्या नूतन राजवटीस यश चिंतलें आहे. ‘शुभास्ते पंथानः सन्तु’ झाल्यावर त्यांनीं सिंध प्रांत वेगळा झाल्यानें मुंबई इलाख्याच्या सरकारची सांपत्तिक स्थिति कशी सुधारणार आहे, याचें दिग्दर्शन केलें. चालू वर्षाच्या दुरुस्त केलेल्या बजेटांत २७ लक्ष रुपयांची तूट आहे आणि उत्पन्न–खर्चाच्या नैमित्तिक बाबी हिशेबांत धरल्यास ती ५२ लक्ष रुपये भरते. परंतु सिंधचें विभक्तीकरण आणि डेव्हेलपमेंट लोनच्या व्याजांत झालेली बचत ह्यामुळें सदरहु तूट नाहींशी होऊन ४५ लक्ष रुपयांचा वाढावा उरत आहे! येत्या एप्रिलपासून सुरू होणाऱ्या प्रांतिक बजेटांत सिंधच्या उत्पन्न–खर्चाचा अंतर्भाव केलेला नाहीं, ह्याचें कारण उघड आहे. शेजाऱ्याच्या जमाखर्चाची उठाठेव करण्याचा मुंबई इलाख्याच्या सरकारास व कायदेमंडळास आतां अधिकार पोहोचत नाहीं. सिंध विभक्तीकरणाविषयींच्या वर उल्लेखिलेल्या हुकमास राजेसाहेबांची संमति अजून मिळावयाची आहे व ती रीतसर येईलहि. तें वेळेवर न घडल्यास जादा बजेटाची व्यवस्था करावी लागेल, हें उघड आहे. एखाद्या कुटुंबांत वांटणी झाली असतां मालमत्तेची विभागणी ज्याप्रमाणें करतात त्याच पद्धतीचा अंगीकार प्रस्तुत प्रकरणीं केलेला आहे.

चालू सालच्या बजेटांत ४५ लक्ष रुपयांचा वाढावा झाला आहे, त्यांतले ९ लक्ष रुपये, बैलगाड्यांवर घेण्यांत येणाऱ्या जकातीची माफी त्यासंबंधांतल्या नवीन झालेल्या कायद्याप्रमाणें द्यावी लागेल, तिच्या प्रीत्यर्थ खर्च होतील आणि मोटारींवर ह्यापुढें कर घेतला जाईल, त्याच्या उत्पन्नापैकीं येत्या सालापुरते ६¾ लक्ष रुपये परत करावे लागतील. प्राथमिक शिक्षणाबद्दल स्थानिक स्वराज्य संस्थांस मिळणाऱ्या ग्रँटमध्यें १९३१ व १९३२ सालीं सरकारनें काट दिला होता. आतां त्यापैकीं ६¾ लक्ष रुपये खर्चण्याचें ठरलें असून इंडिअन वुइमेन्स युनिव्हर्सिटीस अर्धा लाख रुपये मिळावयाचे आहेत, ही आनंदाची गोष्ट आहे. मुंबईंत क्वीन्स रोडवर ह्या संस्थेसाठीं हिंदुस्थान सरकारच्या मालकीची एक जागा खरेदी करण्यास सहाय म्हणून ही ग्रँट दिली जाणार आहे. मध्यम वर्गांत आज बेकारी भीषण स्वरूपांत दिसत आहे, तिला आळा घालण्याचे उपाय योजिले जातील, त्यांस सरकारची मदत व्हावी ह्या हेतूनें, धंदेशिक्षणाप्रीत्यर्थ अर्धा लाख रुपये खर्चले जाणार आहेत. बेकारीच्या प्रश्नाबाबत सरकारचें कांहीं कर्तव्य आहे, ह्या विषयींची जाणीव मूर्त स्वरूपांत मुंबई सरकारनें व्यक्त केली आहे हें सुचिन्हच गणलें पाहिजे. हा प्रश्न सुटणें जवळ जवळ अशक्य असून युनिव्हर्सिटी आणि जनता ह्यांच्या कक्षेंत तो पडतो असें गव्हर्नरसाहेबांनीं आपल्या भाषणांत म्हटलें आहे, ह्यावरून सरकारची आर्थिक सुषुप्ति अजून किती गाढ आहे, याची मात्र कल्पना येते. समाजाच्या चालीरीतींत आणि कल्पनांत फेरबदल झाल्यावांचून बेकारीचा त्याच्या मागचा ससेमिरा दूर व्हावयाचा नाहीं आणि उच्च शिक्षणाच्या पद्धतींतहि सुधारणा झाली पाहिजे असा आपला अभिप्राय त्यांनीं व्यक्त केला आहे. त्यांतला तथ्यांश सर्वमान्यच आहे. परंतु राष्ट्रीय सरकारचें धोरण आर्थिक प्रगतीस परिपोषक असणें ही गोष्ट बेकारी निवारणाच्या बाबतींत अत्यंत महत्त्वाची आहे, हें येथें विसरून चालावयाचें नाहीं.

उत्पन्नाच्या वाढाव्यांतून ५ लक्ष रुपये प्रांतिक व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या रस्ते, इमारती सारख्या कामांवर खर्च होणार आहेत. नव्या कायदे मंडळाच्या निवडणुकीवर ५½ लक्ष रुपये खर्चले जातील. बाकी राहिलेल्या रकमेचा विनियोग पेन्शनींवर व कित्येक किरकोळ बाबींवर होईल. पुढील सालच्या बजेटांत उत्पन्न १२ कोटि, ३ लक्ष रुपये धरलें असून खर्च जवळ जवळ तितकाच होइल असा अंदाज आहे. कायदेमंडळानें मागें मंजूर केलेले नवे कर तसेच चालू राहतील ह्या कल्पनेवर हें बजेट बसवलेलें आहे आणि त्या सर्वांस पुन्हां मंजुरी यंदा मिळाली नाहीं तर त्याची सबंद इमारत ढासळेल आणि सरकारनें योजिलेल्या जादा खर्चास काट मारणें प्राप्त होईल अशी इशारत गव्हर्नरसाहेबांनीं स्पष्ट दिली आहे. हिंदुस्थान सरकार व मुंबई सरकार ह्यांच्यामधल्या उत्पन्नाच्या वांटणीचा फेरविचार चालू असल्यानें पुढील सालच्या बजेटास कायदेमंडळानें पूर्ण पाठिंबा दिला नाहीं तर प्रांतिक सरकारची बाजू प्रचलित वाटाघाटींत लंगडी पडेल असें त्यांचें म्हणणें आहे. गेल्या चार वर्षांत लोकांस न रुचणारे व कायदेमंडळांत विरोधाचा विषय झालेले असे कर बसवण्यांत आले आहेत त्यांस अनुलक्षून वरील इशारत आहे.

### पुढील सालचें प्रांतिक बजेट

| | रुपये |
|---|---|
| उत्पन्न | १२,०३,५८,००० |
| खर्च | १२,०३,१७,००० |
| वाढावा | ४१,००० |

## हिंदी रेल्वे-बजेटांत पुनः तूट

हजारो मैल लांबीच्या रेल्वे रस्त्यांची मालकी सरकारकडे आहे, कित्येक रेल्वे कंपन्यांचे भागीदारींत सरकारचा मोठा हिस्सा आहे व कांहीं लहान कंपन्यांचे भांडवलावरील व्याजाची त्यानें हमी घेतलेली आहे. रेल्वेजकडून सरकारास मिळणारें उत्पन्न व आगगाड्यांवर होणारा खर्च, ह्यांचा इतर सरकारी उत्पन्न-खर्चाशीं अर्थातच निकट संबंध आहे. आगगाड्यांचा कारभार कार्यक्षमतेनें चालावा व त्यांच्या वाढीस लागणारें भांडवल निश्चितपणें मिळावें, अशी व्यवस्था होणें जरूर असून, आगगाड्यांचें अंदाजपत्रक हिंदुस्थान सरकारच्या मुख्य अंदाजपत्रकापासून स्वतंत्र असावें, अशी ॲकवर्थ कमिटीनें १९२१ सालीं सूचना केली. रेल्वे कंपन्या, आगगाड्यांच्या धंद्यावर जर पैसे मिळवतात, तर हिंदुस्थान सरकारला तसा नफा का मिळूं नये ? ह्या विचारसरणीस अनुसरून सदरहु नव्या व्यवस्थेंत एक योजना समाविष्ट करण्यांत आली. ती अशी कीं, विवक्षित वर्षाच्या अगोदरचें एक वर्ष टाकून त्याच्या पूर्वीच्या वर्षांत आगगाड्यांच्या धंद्यांत जेवढें सरकारी भांडवल गुंतलेलें असेल, त्यावर एक टक्का हिंदुस्थान सरकारास मिळावा आणि ह्याखेरीज जो अधिक नफा होईल, त्यापैकीं एक पंचमांश भाग सरकारास मिळावा व उरलेला भाग आगगाड्यांच्या शिलकी निधींत जावा. रेल्वे खात्याकडून सरकारास पैशाची मदत व्हावी, अशी अपेक्षा असतांना, १९३०–३१ सालानंतर मध्यवर्ती सरकारच्या संसारास आगगाड्यांनीं एका पैचाहि हातभार लावलेला नाहीं. त्यापूर्वी मात्र ४२ कोटि रुपये ह्या खात्यानें सरकारास अदा केले परंतु ह्या रकमेनें त्या मागच्या सालांतला तोटाहि पुरा भरून निघाला नव्हता, हें विसरतां कामा नये.

दरसाल, सरकारी मुख्य बजेटाचे आधी कांहीं दिवस रेल्वे-बजेट मध्यवर्ती कायदेमंडळांस सादर करण्यांत येतें. त्याप्रमाणें, गेल्या ता. १७ फेब्रवारी रोजीं गव्हर्नर-जनरलच्या कार्यकारी कौन्सिलांतील व्यापारीखात्याचे सभासद, सर झ. फरुल्लाखान, ह्यांनीं व चीफ कमिशनर सर गथ्री रसेल ह्यांनीं अनुक्रमें असेंब्ली व कौन्सिल ऑफ स्टेट ह्यांमध्यें येत्या वर्षाचें बजेट मांडलें.

१९३५-३६ सालीं रेल्वे-बजेटांत सुमारे दोन कोटि रुपयांची तूट येईल, असा अंदाज सुरवातीस करण्यांत आला होता. हें वर्ष मार्च अखेर संपतें. आतांपर्यंतच्या उत्पन्न-खर्चाच्या आंकड्यांवरून, ह्या तुटींत सालअखेर २३⁄४ कोटी रुपयांची भर पडेल, अशी अपेक्षा आहे. म्हणजे, एकूण तूट ४१⁄२ कोटींवर जाणार, असा रंग दिसतो. हिंदुस्थानांतील कित्येक रेल्वे रस्ते लष्करी संरक्षणाच्या दृष्टीनें विशिष्ट भागांत आंखण्यांत आले, त्यांपासून अर्थातच निवळ उत्पन्न मिळत नाहीं. अशा रस्त्यांवरील आगगाड्यांपासून रेल्वेखात्यास दरसाल दोन कोटि रुपयांची बूड येते. ही तूट वास्तविक लष्करी खात्यानें सोसली पाहिजे, अशी आज कित्येक दिवस लोकांची तक्रार आहे. परंतु ती रेल्वेच्या एकूण हिशेबांत दाखल झाल्यानें लष्करी खर्च कमी दिसतो व रेल्वेखात्यास तोटा येतो.

येत्या, म्हणजे १९३६-३७ सालीं, आगगाड्यांपासून एकूण उत्पन्न ९११⁄२ कोटि रुपये होईल व त्यापेक्षां ३१⁄२ कोटि रुपये ज्यास्त खर्च होऊन बजेटांत तेवढी तूट पडेल, असा अजमास करण्यांत आला आहे. आगगाड्यांच्या शिलकी निधांतून वेळोवेळा कर्जाऊ रकमा घऊने आजवर ह्या खात्यानें वेळ भागवून नेली. येत्या वर्षअखेर ह्या कर्जाची रकम ३५१⁄२ कोटि रुपये भरेल व फंडांत फक्त ११३⁄४ कोटि रुपये शिलक रहातील. रेल्वेखात्यास चांगले दिवस येऊन बजेटांत वाढावा येऊं लागला, म्हणजे शिलकी निधींतून उचललेल्या रकमांची भरपाई करावी लागेल. ती होते किंवा नाहीं व झाली तर कशी होते ह्याची आज शंकाच आहे...

रेल्वेच्या उत्पन्नांत झालेल्या घटीची चिकित्सा करतांना कायदेमंडळांतील सरकारच्या दोन्ही प्रतिनिधींनीं खालील गोष्टींचा उल्लेख केला. (१) जागतिक आर्थिक मंदी व पडते बाजारभाव. (२) आंतरराष्ट्रीय मोकळ्या व्यापाराऐवजीं आर्थिक स्वावलंबनाकडे राष्ट्रांचा ओढा. (३) मोटार वहातुकीची स्पर्धा. (४) मजूरांबाबतचे कायदे. (५) रेल्वे नोकरांच्या नोकरीसंबंधांतील सढळ योजना. त्याखेरीज, तिकिटांशिवाय प्रवास व मालाचें पुरें भाडें आकारण्यांत ढिलाई, ह्यामुळें रेल्वेजचें अत्यंत नुकसान होत असून, त्या दोन्हींचा बंदोबस्त करण्यांत यावयाचा असल्याचा निश्चय जाहीर करण्यांत आला.

गहू, कपास, ताग, इत्यादि पिकांच्या लागवडीच्या क्षेत्रांत घट झाल्यामुळें व मालाच्या किंमती उतरल्यामुळें हिंदी रेल्वेजचें उत्पन्न कसें कमी झालें, ह्याची माहिती सर रसेल ह्यांनीं विस्तारानें दिली. एखाद्या ठिकाणीं कपाशीची लागवड वाढली, म्हणजे त्या मानानें तेथील धान्याचें पीक कमी होतें. सहाजिकच, धान्याचे प्रदेशांतून तेथें धान्य आणावें लागतें व कपास बाहेर पाठवावी लागते. ही वहातुक आगगाड्यांस अर्थातच फलदायक होते. ह्या उलट, कपाशीच्या जागीं धान्याचें पीक लावलें म्हणजे मालाची ये जा कमी होते. १९२५–२६ सालीं २ कोटि, ८४ लक्ष एकरांत कपास लावण्यांत आली होती. १९३२ सालीं २ कोटि २५ लक्ष एकरच कपाशीखाली आले व त्याबरोबर ह्या पिकांच्या वहातुकीपासून रेल्वेजना मिळावयाच्या उत्पन्नाचा आंकडा ४१⁄२ कोटींवरून ३१⁄२ कोटींवर आला. हीच गोष्ट तागाचे पिकांचीहि आहे. पिकांचे भाव पूर्ववत झाल्यावर ही तूट भरून येईल, परंतु मोटारींची स्पर्धा मात्र कमी न होतां ती वाढण्याचीं चिन्हें दिसत आहेत.

हिंदुस्थानांतील खासगी रेल्वे कंपन्या आज नफा मिळवीत असतां सरकारी रेल्वे कां बुडींत येतात, हा विचार करण्याजोगा प्रश्न आहे. आज कित्येक वर्षें हिंदुस्थान सरकारनें आगगाड्यांवर जो खर्च केलेला आहे, त्याची भरपाई तर राहोच, परंतु चालू खर्चाची तरी तोंडमिळवणी होणें जरूर आहे. हिंदी रेल्वेजचा कारभार कुशल तज्ज्ञांचे हातीं आहे, असें सरकारचें मत असलेंच पाहिजे. मग रेल्वेजच्या उत्पन्नांत सुधारणा होऊं नये हें आश्चर्यजनक नाहीं काय ? प्रचलित मंदीचें कारण पुढें केल्यानें वरील प्रश्नास समाधानकारक उत्तर मिळण्यासारखें नाहीं.

*For All Medicinal Requisites*
— TRY —
**N. MAHADEV & Co.**
**DISPENSING CHEMISTS**
AND
**DRUGGISTS**
City Post Office Corner, POONA 2.

# स्फुट विचार

## पैशाची वर्गावर्गी व सहकारी बँका

पूना सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेचे मॅनेजिंग डायरेक्टर, श्री. चितळे, ह्यांचे वरील विषयाबाबतचे विचार, आजच्या अंकांत दुसरीकडे प्रसिद्ध केलेल्या त्यांच्या लेखांत व्यक्त करण्यांत आले आहेत, त्यांकडे वाचकांनीं अवश्य लक्ष द्यावें. सहकारी बँकांनीं परस्परांवरील व परस्परांकडे वेळोवेळ पाठविलेल्या चेक्सची वसुली विनाकमिशन करावी, अशी जी प्रचलित व्यवस्था आहे, तीमध्यें प्रांतिक सहकारी बँकेच्या विशिष्ट स्थानामुळें व तिच्या शाखांच्या विस्तृत जाळ्यामुळें जिल्हा बँकांची व अर्बन बँकांची चांगली सोय झाली आहे. त्या मानानें मध्यवर्ती बँकेस विशेष फायदा न होतां जादा दगदग आणि खर्च मात्र त्या संस्थेस सोसावा लागत आहे, ह्यांत शंका नाहीं. तेव्हां, मध्यवर्ती बँकेनें पैशाच्या वर्गावर्गीचें काम विनाकमिशन किंवा पोस्टेज सारखा प्रत्यक्ष झालेला खर्चहि न घेतां करणें वाजवी व आवश्यक आहे किंवा काय इत्यादि प्रश्न श्री. ल. म. जोशी ह्यांनीं "अर्था" त मागें प्रसिद्ध झालेल्या आपल्या लेखांत उपस्थित केले होते व त्यासंबंधांत संभवणारीं भिन्नभिन्न मतें चर्चेकरितां पुढें मांडलीं होतीं. प्रांतिक सहकारी बँकेनें थोडीफार झीज सोसून आकुंचित व्यापारी दृष्टि बाजूस ठेवावी; इतकेंच नव्हे, तर वर्गावर्गीची हल्लीची व्यवस्था मुंबई इलाख्यापुरतीच मर्यादित न ठेवतां शक्य तर ती अखिल भारतीय स्वरूपाची करावी, असा श्री. चितळे ह्यांच्या म्हणण्याचा आशय आहे. मध्यवर्ती बँकेची शाखा असलेल्या एकाद्या ठिकाणची अर्बन बँक ह्या व्यवस्थेचा गैरवाजवी फायदा घेऊं लागली, तर त्याबद्दल उपाययोजना केली पाहिजे, हें त्यांस मान्य आहे; योजनेच्या हेतूचा विपर्यास न होण्याबद्दल खबरदारी घेतली जावी, ह्याबद्दलहि त्यांचें मत स्पष्ट आहे. त्यांनीं आपला मार्मिक अभिप्राय प्रांजलपणानें मांडला आहे. तो नीट ध्यानीं येण्यासाठी दुसऱ्या बाजूची मांडणी येणेंप्रमाणें करतां येईल. सहकारी चळवळीच्या आद्य तत्वाच्या दृष्टीनें, सध्या चालू असलेल्या सवलतीच्या योजनेंत फेरबदल होणें आवश्यक वाटत नसलें, तरी अर्बन व इतर बँकांनीं स्वतःस मिळणाऱ्या सवलतींबद्दल कांहींतरी मोबदला द्यावा व प्रांतिक बँकेस विनाकरण विशेष झीज सोसावी लागूं नये हें मतहि त्या तत्त्वाशीं विसंगत नाहीं, ही गोष्ट मान्य करावी लागेल. सहकारी चळवळींतल्या आपल्या विशिष्ट स्थानास अनुरूप अशी कामगिरी बजावण्याची जबाबदारी प्रांतिक बँकेवर येऊन पडते व ती तिनें पार पाडली पाहिजे ह्यांत वाद नाहीं. तथापि, मध्यवर्ती बँकेकडून सयुक्तिक मर्यादेच्या बाहेर स्वार्थत्यागाची अपेक्षा करीत रहाणें इष्ट आणि स्वावलंबनाच्या तत्वास साजेसें होणार नाहीं हेंहि विसरतां कामा नये. श्री. जोशी व श्री. चितळे ह्यांचे, वरील विषयावरील लेख प्रस्तुत प्रश्नाच्या चर्चेस चालना देण्यास अत्यंत उपयुक्त असून त्याबद्दल इतरांसहि आपले विचार मांडावयाचे असल्यास 'अर्था' मध्यें त्यांस स्थळ मिळेल. ह्या प्रश्नाची सर्व दृष्टींनीं छाननी झाली म्हणजे त्याचा निर्णय लागण्यास सहाय होईल, हें उघड आहे.

---

## सहकारी शिक्षणासाठी हिंदुस्थान सरकारची ग्रँट

हिंदुस्थान सरकारनें ग्रामोद्धाराकरितां एक कोटि रुपये चालू सालीं खर्च व्हावे म्हणून बाजूस काढून ठेविले होते, त्याचप्रमाणें, सहकारी चळवळीप्रीत्यर्थ १५ लक्ष रुपयेहि प्रांतिक सरकारांमध्यें वांटण्याचें त्यांनीं ठरविलें होतें. पंजाबचे सिव्हिलियन अधिकारी, मि. डार्लिंग, ह्यांनीं गेल्या वर्षी सर्व प्रांतांमध्यें हिंडून रिझर्व्ह बँक व हिंदुस्थान सरकार ह्यांस विशिष्ट बाबतींत सल्ला देण्याच्या हेतूनें सर्वत्र चौकशी केली. सहकारी चळवळीच्या प्रगतीस सहाय म्हणून मिळावयाच्या हिंदुस्थान सरकारच्या ग्रँटचा विनियोग कसा व्हावा, ह्या बाबतींतहि त्यांनीं शिफारसी केल्या असून त्यांस अनुसरून प्रांतिक सरकारांनीं सहकारी चळवळींतल्या अधिकाऱ्यांच्या व सहकारी संस्थांच्या सभासदांच्या शिक्षणासंबंधानें योजना अमलांत आणण्याचें ठरविलें आहे, अशी माहिती लेजिस्लेटिव्ह असेंब्लींत एका प्रश्नास उत्तर देतांना सर गिरिजाशंकर बाजपेय ह्यांनीं दिली. प्रत्येक प्रांतांत प्राथमिक सहकारी मंडळ्यांच्या सभासदांची संख्या जेवढी असेल, तिच्या प्रमाणांत त्यांतील सरकारास १५ लक्ष रुपयांचा हिस्सा मिळावयाचा आहे असें त्यांनीं सांगितलें. मुंबई इलाख्याच्या वांट्यास सुमारें १½ लक्ष रुपये येतील आणि सहकारी खात्यांतल्या अधिकाऱ्यांच्या शिक्षणाची योजना प्रांतिक सरकारनें तयार केली असून तिच्या अंमलबजावणीस प्रारंभहि झाला आहे. सुरवातीस सहा-सात निवडक अधिकाऱ्यांचा एक वर्ग बनवून त्यांस सहकारी चळवळीच्या निरनिराळ्या अंगांचें सोपपत्तिक ज्ञान द्यावयाचें आणि त्यांस भावी शिक्षक म्हणून तयार करावयाचें अशी ही योजना असल्याचें समजतें. प्रत्यक्ष कामाचा व्यावहारिक अनुभव असलेले हे अधिकारी असल्यानें त्यांस तात्विक आणि व्यापक दृष्टि देणारें शिक्षण मिळाल्यास त्यांच्या हातून इच्छिलेलें कार्य पुढें उत्तम रीतीनें पार पडेल, अशी अपेक्षा आहे.

---

## हिशेब तपासनीसांचा दाखला

संयुक्त भांडवलाच्या मंडळ्यांचे हिशेब तपासून ते व्यवस्थित असल्या विषयींचा दाखला लायक ऑडिटरांनीं लेखी द्यावा लागतो व मंडळ्यांच्या वह्या, पावत्या इत्यादि कागदपत्र तपासून हिशेब बरोबर ठेवले असल्याबद्दल त्यांनीं स्वतःची खात्री करून घ्यावी लागते. भागीदारांच्या दृष्टीनें ऑडिटरांची तपासणी व त्यांचा दाखला ह्यांस विशेष महत्त्व आहे आणि ह्या संबंधांत हिशेब तपासनीसांवर एक प्रकारची खास जबाबदारी येऊन पडते. बँक ऑफ इंडियाच्या भागीदारांची वार्षिक सभा गेल्या आठवड्यांत भरली असतां तीमध्यें, ऑडिटरांच्या दाखल्याबाबत एक उपयुक्त सूचना करण्यांत आली, तिचा उल्लेख येथें करणें आवश्यक आहे. आम्हीं ताळेबंद, हिशेबाच्या वह्या, रोकड शिल्लक व रोखे पाहिले ( examined ) आहेत अशा अर्थाचा शेरा देण्याची पद्धति कित्येक तपासनीसांनीं अलीकडे चालू केली आहे; परंतु असल्या शेऱ्यावरून, त्यांनीं पावत्या हिशेबाशीं पडताळून पाहिल्या आहेत किंवा नाहीं, हें स्पष्ट होत नाहीं अशी तक्रार उपस्थित करण्यांत येऊन, आम्हीं हिशेब तपासून, पडताळून पाहिले ( audited ) आहेत, असा शेरा केला जावा ह्या प्रकारची सूचना पुढें मांडण्यांत आली. ऑडिटरांची जबाबदारी स्पष्टपणानें व्यक्त होण्यास त्यांचा दाखला कोणत्या शब्दांत व्यक्त केला जावा, या प्रश्नाचा खल अनेक मंडळ्या करीत आहेत. बँक ऑफ इंडियाच्या चालकांनीं वर निर्दिष्ट केलेली सूचना अमलांत आणली असल्याचें परवांच्या वार्षिक सभेंत जाहीर रीतीनें सांगण्यांत आलें, ही गोष्ट समाधानकारक आहे. ह्यावरून ऑडिटरांच्या दाखल्याच्या नमुन्यांत अधिक

स्पष्टता उत्पन्न होणें अगत्याचें आहे, ही गोष्ट सिद्ध झाली आहे. त्यांच्या खास कामाच्या कक्षेबाहेर ऑडिटरांवर जबाबदारी टाकणें चुकीचें होईल. परंतु विशिष्ट मर्यादेंत त्यांनीं आपली जबाबदारी असंदिग्ध रीतीनें उचलणें अगत्याचें आहे, ह्यांत शंका नाहीं.

### कॅलेंडर-प्रदर्शन

पुणें येथें श्री गणेश मोफत वाचनालयाच्या जागेंत, शेट पोपटलाल शहा ह्यांचे दिवाणखान्यांत, कॅलेंडर-प्रदर्शनाचा उद्‌घाटन समारंभ गेल्या गुरुवारीं प्रो. काळे ह्यांच्या हस्तें झाला. प्रदर्शनाचे चिटणीस, श्री. हरी भालचंद्र देशपांडे, ह्यांनीं सदरहु उपक्रमाचे कामीं पुष्कळ श्रम केले असून अनेक व्यापाऱ्यांचीं कॅलेंडरें जमवण्यांत आलीं आहेत. कॅलेंडर हा मालाच्या जाहिरातीचा एक प्रकार असल्यानें व्यापारी व कारखानदार यांनीं त्याच्या द्वारें ज्यास्त गिऱ्हाइक कसें आकर्षतां येईल इकडे लक्ष्य पुरवलें पाहिजे असें सांगून प्रो. काळे ह्यांनीं आधुनिक युगांत जाहिरातीचें महत्त्व कां व किती आहे ह्याचें विवेचन युरोपिअन राष्ट्रें आणि जपान इत्यादि राष्ट्रांचीं उदाहरणें देऊन सुगम रीतीनें केलें. जनतेची अभिरुचि बारकाईनें ध्यानांत आणून तिला अनुसरून माल तयार करणें आणि तो परप्रांतांतच काय, पण परदेशांतहि खपवण्याचा यत्न करणें हें हिंदी कारखानदारांचें व व्यापाऱ्यांचें कर्तव्य आहे; आणि असें होईल तरच स्वदेशी उद्योगधंद्यांचें पाऊल पुढें पडण्याची महाराष्ट्रास आशा आहे. माझा माल चांगला असेल तर गिऱ्हाइक माझ्या कारखान्यांत किंवा घरीं येऊन तो घेईल असें म्हणून स्वस्थ बसण्याचे धंदेवाल्यांचे दिवस गेले. आपल्या मालाचा प्रकार व त्याचें भावी गिऱ्हाइक ह्यांस साजेल अशा प्रकारचें कॅलेंडर बनवण्यांत आलें पाहिजे आणि जाहिरात म्हणून उपयोगल्या जाणाऱ्या इतर जिनसांसहि हाच नियम लागू आहे. कॅलेंडर ही क्षुल्लक गोष्ट आहे असें सकृद्दर्शनीं वाटेल, पण मालाच्या जाहिरातीचें प्रतीक ह्या दृष्टीनें त्याकडे पहाणें आवश्यक आहे. प्रस्तुत प्रदर्शनानें जनतेंत औद्योगिक व व्यापारविषयक प्रगतीस सहाय होवो अशी इच्छा प्रदर्शित करून प्रदर्शनाच्या उत्पादकांचें, त्यांचा उत्साह व कल्पकता ह्यांबद्दल अभिनंदन करून प्रो. काळे ह्यांनीं आपलें भाषण समाप्त केलें.

### शिक्षण प्रसारक मंडळीच्या स्कूल ऑफ कॉमर्सचें वार्षिक

वरील वार्षिकाचा पहिला अंक आमचेकडे आला आहे. व्यापारी शिक्षणाचें उच्च शिक्षण देणाऱ्या कॉलेजांप्रमाणेंच, मध्यम प्रतीचें शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांचा व्यापारविषयक ज्ञानाचा पाया तयार करून व्यवहारी शिक्षण देणाऱ्या शाळांचीहि पण महाराष्ट्रास आज जरूर आहे. येथील शिक्षण प्रसारक मंडळीच्या स्कूल ऑफ कॉमर्सचे ह्या संबंधांतील प्रयत्न अभिनंदनीय आहेत. या संस्थेनें आतां आपल्या वार्षिकाच्या रूपानें जनतेस स्वतःच्या कार्याची ओळख करून देण्याचा उपक्रम केला आहे. प्रस्तुत अंकांत बँकिंग, व्यापारी शिक्षण, ताळेबंद, व्यापारी भूगोल, विमा व्यवसाय, उद्योगधंदे, इत्यादि विषयांवर चांगले लेख आले आहेत. वार्षिकास मराठी विभाग जोडला आहे हें ठीक आहे. तथापि, कविता आणि गोष्टी यांचा त्यांत झालेला अंतर्भाव औचित्यास धरून व व्यावहारिक उपयुक्ततेस पोषक आहे असें वाटत नाहीं. ह्याची जाणीव व्यवस्थापकांच्या स्फुट लेखांत व्यक्त झालेली आहे ही समाधानाची गोष्ट आहे. व्यापारी पाठशाळेचें उद्दिष्ट त्याच्या शिक्षणपद्धतींत आणि विद्यार्थ्यांच्या मनोरचनेंत व कृतींत प्रतीत व्हावें आणि ह्यापुढील अंकांत ध्येयास अनुरूप असे लेख प्रसिद्ध करण्याची खबरदारी घेतली जावी अशी सूचना करणें आवश्यक दिसते. वार्षिकाचे सुरवातीस प्रो. काळे ह्यांचा अभीष्टचिंतनपर संदेश देण्यांत आला आहे.

### नोकऱ्यांवर परदेशीयांच्या उड्या

आर्थिक मंदीमुळें सर्व देशांतून बेकारी माजली असल्यानें, नोकऱ्या कमी पण अर्जदार पुष्कळ अशी परिस्थिति सर्वत्र निर्माण झाली आहे. इंग्लंडमधील परिस्थिति इतर देशांचे मानानें किती तरी चांगली आहे. तथापि, तेथेंहि नोकऱ्यांसाठी स्पर्धा व धडपड चालली असल्याचें आढळतें. दरसाल सुमारें पांच हजार मुली इतर देशांतून कामाच्या शोधार्थ इंग्लंडमध्यें येतात व तेथील ऑफिसांतील नोकऱ्या पटकावतात. त्यामुळें कित्येक ब्रिटिश मुलींना नोकऱ्या मिळत नाहींत. पार्लमेंटमध्यें हा प्रश्न उपस्थित केला जाऊन, परदेशांतील मुलींना नोकऱ्या मिळूं नयेत अशी व्यवस्था व्हावी, असे प्रयत्न चालू आहेत. हिंदुस्थानांतील कांहीं प्रांतांतून परप्रांतांत वसति करण्यास जाणारांची संख्या दरसाल वाढत आहे व त्यांच्या अनिष्ट स्पर्धेबद्दल तक्रार ऐकूं येत आहे. ह्या संबंधांतील माहिती 'अर्था'च्या गेल्या अंकांत आलेलीच आहे.

### हिंदुस्थानांतील कोळसा : औद्योगिक प्रगतीच्या मार्गांत अडचण येणार काय ?

येत्या शंभर वर्षांत, हिंदुस्थानांतील खाणींमधून निघणारा कोळसा संपून जाईल व औद्योगिक प्रगतीच्या मार्गांत ती मोठीच अडचण उपस्थित होण्याचा संभव आहे, अशा अर्थाचा अभिप्राय एका सरकारी पत्रकांत ('डायरेक्टर ऑफ दि जिऑलॉजिकल सर्व्हे'नें प्रसिद्ध केलेल्या बुलेटिनमध्यें) आढळतो. ह्या देशाच्या पोटांत सुमारें ४५० कोटि टन चांगल्या दर्जाचा कोळसा आहे, तो फार तर २०० वर्षें पुरेल. हल्लींची कोळसा उकरून काढण्याची पद्धत सुधारण्यांत आली नाहीं, तर तो १०० वर्षें तरी पुरेल किंवा नाहीं, ह्याची शंका आहे. लोखंडाचा पुरवठा मात्र कमी पडण्याचा संभव नाहीं. वरील ४५० कोटि टन कोळशापैकीं फक्त १७० कोटि टनच उत्कृष्ट ह्या सदरांत येईल. कोळशासारखे खनिज पदार्थ संपून जाण्याची भीति ग्रेटब्रिटनमध्येंहि वेळोवेळ व्यक्त करण्यांत येत असते. परंतु असल्या अंदाजांनीं कोणीहि घाबरून जाण्याचें कारण नाहीं.

K. K. & Co.
Photographic Dealers
POONA.

एन. ए. ॲन्ड फ्रेन्ड्स
स्टेशनर्स, जनरल मर्चन्टस, ॲन्ड कमिशन एजन्टस.
आप्पा बळवंत चौक, पुणें २.

## सहकारी संस्थांच्या पैशाची वर्गावर्गी

( लेखकः—श्री. द्. दि. चितळे, पुणें. )

मुंबई इलाख्यांतील सहकारी बँकांची सुसंघटना व एकीकरण होऊन परस्परांचा व्यवहार वाढीस लागावा, त्यांचे खातेदारांस अल्प कमिशनवर दूरदूरच्या ठिकाणचे चेक्स वसूल करतां यावेत व त्यायोगें पैशाच्या अंतर्गत देवघेवीचे व्यवहार सुलभ, स्वस्त व झपाट्यानें व्हावेत या सद्हेतूनें सुमारें सातआठ वर्षांपूर्वी या इलाख्यांतील तज्ज्ञ सहकाऱ्यांची व बँकांची एक परिषद भरून सहकारी चळवळीचा प्रसार आणि सर्वांगीण उन्नति होण्याचे दृष्टीनें सहकारी संस्थांच्या पैशांची वर्गावर्गी विनाकमिशन करण्यासंबंधीं एक योजना निश्चित करण्यांत आली होती, हें सहकारी मंडळीस व बँकांस विदित आहेच. सदर योजनेस अनुसरून ज्या संस्था या योजनेंत सामील झाल्या त्या आजपर्यंत अल्प खर्चांत अगर विनाकमिशन आपल्या पैशांची वर्गावर्गी करीत आल्या आहेत; व त्या योगें सहकारी बँकांची बरीच प्रगति झाली असून त्यांच्या सभासदांत व खातेदारांत पैशाची उलाढाल करण्याची दिवसेंदिवस वाढती प्रवृत्ति निर्माण झाली आहे, हें सहकारी चळवळीचे दृष्टीनें भूषणावह आहे.

ही पैशाची वर्गावर्गी मध्यवर्ती बँकेमार्फत आजपर्यंत पोस्टेज-सारख्या अल्प खर्चांत केली जात आहे. परंतु यापुढें ती तशीच केली जाणें इष्ट व व्यवहार्य आहे कीं कसें असा प्रश्न श्री. ल. म. जोशी यांनीं " अर्थ " साप्ताहिकांत ता. २९।१।३६ व ता. ५।२।३६ च्या दोन अंकांतील आपल्या लेखांत उपस्थित केला आहे. इलाखा मध्यवर्ती बँक ही सहकारी संस्थांची मेरूमणी ( Apex ) बँक असल्यानें अर्बन बँका व तिचे सभासद यांचे देवघेवीचे व्यवहार दिवसेंदिवस वाढण्याचे दृष्टीनें त्यांस प्रोत्साहन मिळावें म्हणून मध्यवर्ती बँकेनें थोडी फार झीज सोसूनहि पैशाची वर्गावर्गी पूर्वीप्रमाणेंच विनाकमिशन करीत रहावें, असें आमचें मत आहे. मध्यवर्ती बँकांची पत व मोठेपणा हीं तिला जोडलेल्या दुसऱ्या सहकारी संस्थांच्या सामुदायिक पतीवर व मोठेपणावर अवलंबून असल्यानें जोडलेल्या सोसायट्यांच्या व्यवहारांत सारखी वाढ होत रहावी, याकडे तिनें अत्यंत बारकाईनें लक्ष पुरविलें पाहिजे व ती तसें पुरवीत असतां या व्यवहारांतून अर्बन बँकांना मिळणाऱ्या उत्पन्नापैकीं कांहीं कमिशन आपणांसहि मिळावें अशी आकुंचित व्यापारी दृष्टि तिनें न ठेवतां मध्यवर्ती सहकारी संस्थेस शोभणारी सहकार्याची उदार वृत्ति तिनें ठेवावी, असें आम्हांस प्रांजलपणें म्हणावेसें वाटतें. मध्यवर्ती बँकेची शाखा असणाऱ्या एकाद्या ठिकाणची अर्बन बँक मध्यवर्ती बँकेनें विनाकमिशन पैशाची वर्गावर्गी करण्यासंबंधीं दिलेल्या सवलतीचा स्वार्थीपणानें गैरवाजवी फायदा घेऊं लागली तर त्या अर्बन बँकेसंबंधीं कोणती उपाययोजना करावी, या प्रश्नाचा अधिक बारकाईनें विचार करणें जरूर आहे, ही गोष्ट आम्हांसहि मान्य आहे. परंतु अपवादात्मक कांहीं संस्था या सवलतीचा दुरुपयोग करतात अगर त्या तसा करण्याचा संभव आहे, म्हणून पूर्वीची योजना आमूलाग्र दुरुस्त करावी असें मात्र आम्हांस वाटत नाहीं. आमचे दृष्टीनें यांत अशी एक तोड काढतां येणें शक्य आहे, कीं ज्या एखाद्या विशिष्ट ठिकाणीं मध्यवर्ती बँकेची शाखा व अर्बन बँक या दोन्हीहि असतील तेथें त्या अर्बन बँकेला शाखा कचेरींत ठेवलेल्या आपल्या खात्यांतील पैसे मध्यवर्ती बँकेच्या मूळ ठिकाणीं विनाकमिशन वर्ग करून देऊं नयेत. ही वर्गावर्गी करणें झाल्यास त्यासाठी थोडेसें कमिशन आकारलें जावें. मात्र हा कमिशनचा दर इतर खातेदारांपेक्षां जास्त सवलतीचा असला पाहिजे. या दृष्टीनें पूर्वीचे योजनेंत थोडीफार दुरुस्ती केल्यास सदर सवलतीचा गैरफायदा घेणाऱ्या संस्थांवर एक प्रकारचें बंधन राहून ज्या हेतूनें ही मूळ योजना आखली होती त्याचा विपर्यास होणार नाहीं. मात्र येथें हेंहि नमूद करणें जरूर आहे कीं, सदर ठिकाणीं अर्बन बँकांच्या कार्यक्षेत्रांत येणारा हुंडी, चिठ्ठीसारखा व्यवहार मध्यवर्ती बँकेच्या शाखेनें मुळींच करितां कामा नये. म्हणजे मग आम्हीं वर सुचविलेप्रमाणें पैशाच्या वर्गावर्गीसाठीं योग्य तें कमिशन देण्यास अर्बन बँका तक्रार करतील असें आम्हांस वाटत नाहीं.

मध्यवर्ती बँकेस पोस्टेज, स्टेशनरी, कामगार मंडळीचा पगार, व्याजाची सूट, इत्यादि बाबींवर इतर संस्थांप्रमाणें जरूर तो खर्च करावा लागत असेल याबद्दल दुमत नाहीं. परंतु प्रत्येक सहकारी संस्था ही स्वतःस कमींत कमी फायदा ठेवून आपल्या सभासदांस अगर खातेदारांस जास्तींत जास्त सवलती देण्यासाठी स्थापन झालेली असते ही गोष्ट लक्षांत ठेवली तर मध्यवर्ती बँकेनें थोडी झीज सोसून अगर क्वचित्प्रसंगीं थोडा तोटा सोसूनहि आपल्या कार्यक्षेत्रांत येणाऱ्या अर्बन बँकांस अल्प खर्चांत एवढेंच नव्हे तर बिनखर्चांत पैशाची वर्गावर्गी करण्यास मदत करणें हें तिचें कर्तव्य आहे, असें आम्हांस वाटतें. मध्यवर्ती बँकेकडून थोडें डिव्हिडंड कमी मिळालें तरी तिजकडून केल्या जाणाऱ्या योग्य त्या कामगिरीकडे लक्ष देऊन तिच्या भागीदारांनीं ( आपण एका सहकारी संस्थेचे भागीदार आहोंत याची पूर्ण जाणीव ठेवून ) संतुष्ट रहावयास पाहिजे व तसे ते आहेत असें आम्हांस वाटतें. अशा परिस्थितींत अर्बन बँकांना आजवर दिलेल्या सवलती यापुढें कमी करणें अगर त्या काढून घेणें हें मध्यवर्ती बँकेस इष्ट नसून तिनें तें तसें करूं नये असा तिला आमचा मित्रत्वाचा सल्ला आहे.

सहकारी संस्थांच्या पैशाची वर्गावर्गी कमी खर्चांत करण्याची हल्लींची व्यवस्था ही केवळ मुंबई इलाख्यापुरतीच मर्यादित न ठेवतां शक्य तर ती अखिल भारतीय करण्याचे दृष्टीनें वेगवेगळया मध्यवर्ती बँकांनीं प्रयत्न केला पाहिजे असें आम्हांस वाटतें, व तशी एखादी सोयीची योजना आखली गेली तर सहकारी संस्थांचे दृष्टीनें तें फार श्रेयस्कर होऊन त्यांना स्वतःचे पायावर हळूहळू उभे रहातां येईल व मग हल्लींप्रमाणें सरकार, रिझर्व्ह बँक, इंपीरिअल बँक वगैरे संस्थांकडे विनाकमिशन पैशाची वर्गावर्गी करण्याबद्दल याचना करण्याची फारशी गरज रहाणार नाहीं.

---

### फडनविसांच्या भाषणाचें गौप्य

असेंब्लीमध्यें मांडण्यांत यावयाच्या बजेटाच्या प्रती वर्तमानपत्रांना इतके दिवस कांहीं तास अगर दिवस अगाऊ मिळत असत. यंदा ही पद्धत बदलण्यांत आली आहे. बजेटाचा सिंहावलोकनात्मक पूर्वार्ध सालाबादप्रमाणें आधीं उपलब्ध होईल व त्याबरोबर १,४०० शब्दांत त्याचा सारांश मिळेल. बजेटाचा, विधायक सूचना समाविष्ट असलेला, उत्तरार्ध मात्र, फडनविसांनीं आपल्या भाषणांत त्याचा समाचार घेतल्यानंतरच वर्तमान पत्रांच्या प्रतिनिधींना मिळूं शकेल. त्याच्या प्रती असेंब्लीच्या प्रेसगॅलरींत वांटण्यांत येतील व तेथून त्याचा २२५ शब्दांचा सारांश व पूर्ण भाषण हीं दोन्हीं विद्युत्संदेशानें वर्तमानपत्रांच्या कचेऱ्यांत सत्वर मिळण्याची व्यवस्था होईल.

## इंग्लंडमध्यें आयुष्याच्या विम्याची वाढ

### हिंदुस्थानांतली परिस्थिति

गेल्या तीन वर्षांचा अनुभव पहातां, ग्रेट ब्रिटनमध्यें दरसाल उतरलेल्या विम्यांच्या रकमेंत सुमारें २७० कोटि रुपयांची वाढ होते, असें दिसून येतें. १९३४ सालीं ब्रिटिश विमा मंडळयांनीं सुमारें २७० कोटि रुपयांचें नव्या आयुर्विम्याचें काम मिळवलें आणि १९३५ मध्यें हा आकडा २९० रुपये झाला. ब्रिटिश विमा व्यवसाय एवढ्या मोठ्या प्रमाणावर चालत असला तरी ह्या बाबतींत ग्रेटब्रिटन अजून अमेरिका व कॅनडा ह्या देशांच्या मार्गेंच आहे. गेल्या सालच्या कामांतला वाढावा बहुतेक सर्व विमा मंडळयांच्या व्यवहारांत चलती झाल्यामुळें घडून आला असला, तरी कांहीं विशिष्ट मंडळयांचें काम इतरांच्या मानानें ज्यास्त प्रमाणांत वाढलें असल्याचें आढळून येतें. प्रुडेन्शल ह्या एकट्या कंपनीचें गेल्या सालांतलें काम ३६ कोटि रुपयांचें झालें व तें १९३४ सालाच्या मानानें ४ कोटींनीं अधिक होतें. त्याच्या खालोखाल सन लाइफ कंपनीचें काम २४ कोटि रुपयांचें झालें व त्यांत पूर्वीच्या सालांच्या मानानें १½ कोटि रुपयांचा वाढावा झाला.

आयुर्विम्याचा हा जो सर्वसाधारण विस्तार झालेला दिसतो, त्याचें मुख्य कारण ब्रिटिश जनतेस आपला बचत केलेला पैसा सरकारी व इतर कर्जरोखे आणि मंडळयांचे भाग ह्यांमध्यें गुंतवण्याची संधी उपलब्ध झाली नाहीं, हें आहे. व्यक्तींपेक्षां विमा मंडळया व्याजानें रकमा गुंतवण्याचें काम अधिक यशस्वी रीतीनें करूं शकतात, हा जनतेचा विश्वास वरील वस्तुस्थितीच्या मुळाशीं आहे. तथापि, व्याजाचे सर्वसामान्य दर उतरल्यानें विमा मंडळयांसहि पैसा किफायतशीर रीतीनें गुंतवण्याच्या कामीं अडचण भासूं लागली आहे आणि निदान 'एंडोमेंट' पॉलिसींचे दर चढवणें त्यांस प्राप्त झालें आहे. ह्या धोरणाचा परिणाम मंडळयांच्या कामाच्या आकड्यांवर व सांपत्तिक स्थितीवर झालेला पुढच्या सालीं दिसून येण्याचा पुष्कळ संभव आहे. प्रचलित मंदी हळु हळु दूर होत आहे, आणि रिकाम्या पैशाचा ओघ उद्योगधंदे व व्यापार ह्यांचेकडे वहाण्याचा रंग दिसत आहे. तथापि, विम्याच्या धंद्यांत पैसा येतो त्यास दुसरी मुख्य वाट सरकारी वगैरे रोख्यांकडची असते आणि त्यांचे बाजारभाव उतरल्यास लोकांची प्रवृत्ति त्यांमध्यें पैसे गुंतवण्याकडे होऊन विमा व्यवसायाच्या प्रसारास थोडा आळा बसल्यावांचून रहाणार नाहीं. अशा स्थितींतहि कांहीं बाबी विम्याचा धंदा वाढण्यास अनुकूल आहेत. नियमित मुदतीच्या विम्याच्या पॉलिसींचे दर थोडे चढले असले तरी सबंद आयुष्याच्या प्रकाराच्या पॉलिसींचे दर मृत्यूचें प्रमाण सुधारल्यामुळें उतरले आहेत. शिवाय, विमा-मंडळया नवीन नवीन तऱ्हेच्या पॉलिसी चालू करीत असून ह्यांपैकीं कित्येक योजना लोकप्रिय होत आहेत. घरें बांधण्याच्या मंडळयांस पैसा पुरविण्याचें साधन विमा कंपन्यांस सोइस्कर झालें असल्यानें पैसा गुंतवण्याचा त्यांचा मार्ग ह्या संबंधांत मोकळा आहे. ह्या रीतीनें प्रतिकूल-अनुकूल परिस्थितींचें निरीक्षण केलें असतां आयुर्विम्याच्या क्षेत्रांतला व्यवहार विशेष वाढला नाहीं तरी तो कमी होईल असें म्हणण्यास जागा दिसत नाहीं.

ग्रेटब्रिटनमधल्या विम्याच्या धंद्याच्या सद्यःस्थितीचें केलेलें हें दिग्दर्शन हिंदुस्थानांतल्या विमा मंडळया व जनता ह्यांनीं विचार करण्यासारखें आहे. आमच्या देशांत विमा-व्यवसाय मुळांतच अजून मर्यादित असल्यामुळें त्याच्या विस्तारास बराचसा वाव आहे, ह्यांत संशय नाहीं. ह्या दृष्टीनें पाहिलें असतां येथील परिस्थिती अनुकूल आहे. भोंवतालच्या सर्वसाधारण आर्थिक व विशेषतः खेळत्या भांडवलाच्या बाबतींत ग्रेट ब्रिटनमध्यें असलेल्या वर वर्णिलेल्या वस्तुस्थितीचा प्रकार हिंदुस्थानांतहि अनुभवास येणें साहजिक आहे. रोख्यांच्या व पैशाच्या बाजारांतल्या हालचाली आणि व्याजाचे प्रचलित दर ह्यांचा विमा मंडळयांच्या सांपत्तिक, पैसा गुंतवण्याच्या व पॉलिसीविषयींच्या धोरणाशीं निकट संबंध येथेंहि राहणारच.तेव्हां ब्रिटिश मंडळयांच्या सावधगिरीच्या आणि दूरदर्शित्वाच्या धोरणाचें अनुकरण हिंदी विमा कंपन्यांनीं करणें अगत्याचें आहे. आपणांवर पॉलिसीच्या योगानें येऊन पडणारी सांपत्तिक जबाबदारी आणि गुंतवावयाच्या पैशावर सुटणारें व्याज ह्यांचा योग्य मेळ घालून आपल्या खर्चाचें प्रमाण व पॉलिसींचे दर ह्यांविषयींचें धोरण त्यांनीं काळजीपूर्वक निश्चित केलें पाहिजे. व्याजाचे प्रचलित हलके दर असेच राहतील ह्या अनुमानास भक्कम आधार आहे असें समजण्याचें कारण नाहीं,आणि ह्या संबंधांतली स्थिति अधिक सोयीची होण्याचा चांगला संभव आहे. ज्यांच्या कामाचा पाया विस्तृत व भक्कम आहे अशा मंडळयांचा विस्तार व प्रगति होण्यास इंग्लंडप्रमाणें हिंदुस्थानांतहि वाव आहे. विमा व्यवसायांत पडलेल्या लोकांनीं व जनतेनें परिस्थितीचा शहाणपणानें फायदा करून घेणें इष्ट आहे.

## "थ्रेडनीडल स्ट्रीटची म्हातारी"

### बँक ऑफ इंग्लंडचें टोपणनांव

बँक ऑफ इंग्लंडला "थ्रेड नीडल स्ट्रीटची म्हातारी" असें विनोदात्मक टोपणनांव आहे. ह्या नांवाचा उलगडा अलीकडे झाला आहे तो असा. अनेक वर्षांमागें ह्या बँकेंतील एका कामगारास वेड लागलें आणि त्याच्या बायकोपासून ही गोष्ट लपवून ठेवण्यांत आली. जेव्हां जेव्हां ती आपल्या नवऱ्याबद्दल चौकशी करण्यास बँकेंत जाई तेव्हां तेव्हां त्यास गुप्त कामगिरीवर परदेशीं पाठवण्यांत आलें आहे अशी तिची समजूत काढण्यांत येई. त्या बाईस "थ्रेड नीडल स्ट्रीटची म्हातारी" असें लोक म्हणूं लागले. आणि अखेर तेंच नांव बँक ऑफ इंग्लंडला चिकटलें !

## एका फलविद्याविशारदाची शक्कल

### तरु-बालकें बाटल्यांच्या बोथ्यांतून अन्नरस शोषतात

फळझाडांस त्यांच्या मुळांतून पोषक अन्न न मिळाल्यामुळें तीं नीट वाढत नाहींत असें पाहून एका फलविद्याविशारदानें त्यांस तान्ह्या बालकांप्रमाणें बाटलीनें अन्नरस पाजण्याची शक्कल काढली आहे. झाडांमध्यें पेयाच्या बाटल्या ठेवून त्यांस जोडलेल्या रबरी नळयांस लावलेलीं कांचेचीं बोंडें त्यांच्या खोडांत तो खुपसतो आणि झाडें बाटल्यांतलें पोषक पेय "बोथ्यां"तून शोषून घेतात. ह्या योगानें झाडें सुदृढ होऊन त्यांस चांगलीं व विपुल फळें येतात, असें म्हणतात !

## हिंदी चहाचा धंदा

[ इंग्लंडमधील रॉयल सोसायटी ऑफ आर्ट्सच्या हिंदी विभागापुढें मि. वाट्सन ह्यांनीं वरील विषयावर एक व्याख्यान दिलें. त्यांतील कांहीं महत्त्वाची माहिती येथें उद्धृत केली आहे. ]

( १ ) इंग्लंडमध्यें आयात होणाऱ्या चहावर १६८० सालीं दर पौंडास ३३/४ रु. जकात पडत असे. १९०४ सालीं सुद्धा ८ आणे म्हणजे मूळ किंमतीच्या बरोबरीनें जकात पडे.

( २ ) जगांतील चहाचें उत्पादन १४० कोटि पौंड आहे. एकट्या चीन देशांत ५५ कोटि चहा खपतो.

( ३ ) गेल्या वर्षी ग्रेटब्रिटनमध्यें ४४१/२ कोटि पौंड चहा खपला. सत्तर वर्षांपूर्वी चहाचा वार्षिक खप १२-१३ लक्ष पौंड एवढाच असे.

( ४ ) १८५० सालीं हिंदुस्थानांत फक्त १,००० एकरांत चहाची लागवड होती व त्यांतून २१/२ लक्ष पौंड चहाची निपज होई. सध्या ८ लक्ष ३३ हजार एकर चहाखालीं असून त्यांतून ३८ कोटी ३० लक्ष पौंड चहा निघतो. आज ह्या धंद्यांत १०० कोटि रुपये भांडवल गुंतलेलें आहे.

( ५ ) आसाम, दार्जिलिंग व जलपैगुरी येथें हिंदी पिकाच्या ७७ टक्के चहा पिकतो. मलबार किनाऱ्यावरहि मोठ्या प्रमाणावर लागवड होते.

( ६ ) १९३४ सालीं आसाममधील १,०४६ मळ्यांपैकीं ३३६ मळ्यांची मालकी हिंदी लोकांच्या हातांत होती.

( ७ ) १९३४ सालीं एकूण २१ कोटि रुपये किंमतीच्या चहाची निर्गत झाली. त्यांपैकीं ग्रेट ब्रिटनमध्यें सुमारें १९ कोटि रुपयांचा चहा उतरला.

( ८ ) १९३१-३२ मध्यें आसामांतील मजुरांस ५१/२ कोटि रुपये वेतन मिळालें व सुमारें ५ कोटि रुपये चहाच्या व इतर मालाच्या वहातुकीवर खर्च झाले.

धूम्रपानापासून होणारे वाईट परिणम्म टाळण्यास
शुद्ध व उंची तंबाखूच्या विड्या
ओढणेंच अगत्याचें आहे.
आपली गरज शंभर टक्यांनीं पुरविण्यास
लायक असलेल्या
लंगर छाप विड्याच
ठाकूर सावदेकर कंपनी पुणें
बिडी नं.१
ANCHOR लंगर
BRAND छाप
BIDI No1
THAKUR SAVADEKAR & Co.
POONA
आपले दुकानदाराकडे घ्या.
ठाकूर सावदेकर कंपनी,
फुलवाला चौक, ३७७ वेताळ पेठ, पुणें.

## "अर्था" चें व्यवसायबंधंकडून अभिनंदन

('अर्था'स दुसरें वर्ष लागलें, ह्यासंबंधानें कित्येक व्यवसायबंधूंनीं 'अर्था'च्या कामगिरीबाबत प्रशंसोद्गार काढून त्याचें अभिनंदन केलें आहे, याबद्दल आम्ही त्यांचे अत्यंत आभारी आहों. कांहीं निवडक अभिप्राय खालीं उद्धृत केले आहेत. )

पुण्याचे सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ प्रो. वा. गो. काळे यांनीं सुरू केलेल्या 'अर्थ' साप्ताहिकास एक वर्ष पुरें होऊन, त्यानें दुसऱ्या वर्षांत अधिक जोमानें व आत्मविश्वासानें पदार्पण केलें आहे, याबद्दल आम्हांस अंतःकरणपूर्वक आनंद होत आहे. 'अर्थ' हा विषय बहुजनसमाजाच्या अत्यंत जिव्हाळ्याचा असला तरी तो अत्यंत उपेक्षित आहे. याला कारण त्या विषयाची रुक्षता व दुर्बोधता हेंहि असूं शकेल. सामान्य समाजानें ह्या विषयाची अपेक्षा केली, तरी त्याची उपयुक्तता लवमात्र कमी होत नाहीं.

अर्थशास्त्रासारखा दुर्बोध विषय बालबोध भाषेनें सुबोध व सुगम करून त्याबद्दल जनतेच्या अंतःकरणांत जिज्ञासा व आस्था उत्पन्न करणें, हा प्रो. काळ्यांचा हेतु गेल्या वर्षांत बराच सफल झाला आहे, असें म्हणावयास हरकत नाहीं. लोकांस अर्थ प्रिय असला तरी अर्थशास्त्राबद्दल त्यास औदासिन्य शक्य तेवढें नाहींसें करण्याचा 'अर्था'नें प्रयत्न केला आहे. बुद्धीस फारसा शीण न देतां, जगांतील व विशेषतः हिंदुस्थानांतील अर्थ व्यवहाराचें आवश्यक ज्ञान थोडक्यांत व सोप्या भाषेंत 'अर्था'नें करून दिलें आहे. या महत्त्वाच्या कामगिरीचें श्रेय प्रो. काळे यांस आहे. गेल्या वर्षी आम्हीं म्हटल्याप्रमाणें "अर्थशास्त्रांतील अधिक उच्च व गहन प्रश्नांचा अभ्यास करून ग्रंथनिष्पत्ति करण्यास अत्यावश्यक असलेला वेळ, सामान्य जनतेस शिक्षण देण्यांत खर्च करण्याचें प्रो. काळे यांनीं योजावें" हें विशेषच कौतुकास्पद व अभिनंदनीय होय. प्रो. काळे यांच्या लोक-शिक्षणाच्या ह्या प्रयत्नांत यश येत आहे हें पाहून आम्हास आनंद होत आह. गुणज्ञ महाराष्ट्र 'अर्था'स अधिक आश्रय देऊन आपली कृतज्ञता व्यक्त करील अशी आम्हांस उमेद आहे.

—मातृभूमि ( ३० जानेवारी, १९३६ )

---

महाराष्ट्रांतील विख्यात अर्थशास्त्रज्ञ प्रो. वा. गो. काळे यांच्या संपादकत्वाखालीं गेल्या वर्षी हें साप्ताहिक सुरू झालें. राजकारण आणि अर्थशास्त्र यांचा संबंध इतका निकट आहे कीं, सारें राजकारण द्रव्यमूल आहे म्हटलें तरी चालेल. पण, महाराष्ट्रांत राजकारणाला वाहिलेलीं वृत्तपत्रें जरी अनेक निघत असलीं, तरी आर्थिक प्रश्नांची चर्चा करणारें वृत्तपत्र मात्र एकहि नव्हतें. ती उणीव या साप्ताहिकानें उत्तम भरून काढली आहे. त्यांत निरनिराळ्या प्रकारच्या व्यापारी बातम्या, प्रचलित आर्थिक प्रश्नांचा ऊहापोह व औद्योगिक घडामोडींचा आढावा येत असतो. त्यांतील विवेचन शास्त्रशुद्ध खरें, पण सुबोध असतें. राजकारणी लोकांप्रमाणेंच व्यापारी व धंदेवाईक लोकांनाहि हें साप्ताहिक उपयुक्त आहे. 'अर्था' ला उत्तरोत्तर वाढता लोकाश्रय मिळो, असें आम्ही इच्छितों. वर्गणी चार रुपये.

--महाराष्ट्र ( २ फेब्रुवारी, १९३६ )

## पंजाबमधील जमीन गहाणाच्या बँका

### लायक व्यवस्थापकांचा अभाव : प्रतिकूल परिस्थिति

[ सहकारी जमीन गहाणाच्या बँकांची स्थापना मुंबई इलाख्यांत आतां जिल्हानिहाय झाली असून, त्यांस पैसे पुरविणाऱ्या प्रांतिक मध्यवर्ती जमीन गहाणाच्या बँकेनेंहि आपलें कामकाज सुरू केलें आहे. पंजाब प्रांत ह्या बाबतींत अग्रेसर असल्यानें, तेथील अनुभव इतर ठिकाणच्या बँकांना व कार्यकर्त्यांना मार्गदर्शक होईल. अलिगडच्या मुस्लिम युनिव्हर्सिटीचे मि. अताउल्ला ह्यांच्या, इंडियन जर्नल ऑफ इकनॉमिक्समध्यें प्रसिद्ध झालेल्या, एका लेखांतील माहितीचा सारांश येथें दिला आहे. ]

कर्जाची किमान मर्यादा गहाण जमिनीवरील सान्याच्या तीसपट अशी ठरली असली, तरी पांच हजारांपेक्षां जास्त रकमेचें कर्ज देऊं नये, असें सहकारी खात्याचें धोरण आहे. १९३३ सालानंतर नवीं कर्जे जवळ जवळ अजिबात देण्यांत आलेलीं नाहींत. परतफेडीची मुदत पांच वर्षे होती, ती आतां दहा वर्षे करण्यांत आली आहे.

#### बँकांच्या व्यवहारांतील अडचणी

जमीन खरेदी करण्यासाठीं कर्ज काढण्याची प्रवृत्ति फारच मोठ्या प्रमाणावर असलेली आढळते. भरमसाट किंमती देऊन विकत घेतलेल्या जमिनीपासून नफा काय मिळणार? आतां, अशीं कर्जे देणें बंद करण्यांत आलें आहे.

पात्रता व उत्साह ह्यांचा व्यवस्थापकमंडळांत पूर्ण अभाव आहे; योग्य व लायक डायरेक्टर मिळणें अत्यंत कठीण जातें. डायरेक्टर लोक आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करतात व मित्रांस व नातेवाइकांस कर्जे मिळवून देतात. बँकेच्या हितापेक्षां अप्रामाणिक नातेवाइकांकडे त्यांचा ओढा ज्यास्त असतो. डायरेक्टरांस स्वतःसाठी कर्ज मिळूं नये, अशी तरतूद कटु अनुभवानंतर आतां करण्यांत आली आहे.

कर्ज मागणाराच्या मालमत्तेचा व पूर्वीच्या कर्जाचा अंदाज डायरेक्टरांचे मार्फत करण्यांत येतो, तो क्वचितच विश्वासार्ह असतो. आपल्या स्नेह्यांस व गोतावळ्यांतील लोकांस कर्ज मिळावें म्हणून त्यांच्या बाबतींत ढिलेपणाचें धोरण स्वीकारण्यांत येतें.

अर्जदारास चेकचे रूपानें कर्ज देण्यांत येतें व हा चेक ज्याचेकडून जमिनीचें गहाण सोडवावयाचें असेल त्या गहाणदाराचे नांवानें लिहिण्यांत येतो, परंतु गहाणदार नेहमींच चेक स्वीकारतो असें नाहीं. अर्जदारानें पैशाचा अपव्यय करूं नये म्हणून केलेल्या व्यवस्थेचा दुरुपयोग करण्यास ह्या योगानें डायरेक्टरांस संधि मिळते.

गहाण सोडवलें गेल्यावर रेव्हेन्यू रेकार्डीतील नोंद बदलण्यांत अत्यंत दिरंगाई होते. अर्जदाराचीं विधानें तपासून पडताळण्यासाठी खाते उतारा पहावा लागतो, परंतु रेव्हेन्यू खात्यांतील खालचे कामगार सहकारी खात्यास सहाय करीत नाहींत.

व्याजाचा दर आठ ते नऊ टक्के पडतो. मालाच्या किंमती उतरल्या असल्यानें हा दर शेतऱ्यांस परवडत नाहीं. दरसाल ८५० रुपये खंड देणारी जमीन आज १५० रुपयांस खंडानें द्यावी लागते.

कर्जाची परतफेड वक्तशीर होत नाहीं. डायरेक्टर लोक कर्जदारांवर मेहेरबानी करतात, परंतु बँकेच्या हिताकडे त्यांचें दुर्लक्ष होतें. पुढेंमागें आपल्यावरहि अशीच मेहेरनजर रहावी, हा त्यांचा हेतु असतो.

पंजाबमधील बँकांची स्थापना झाली, तीच मुळी जरा चमत्कारिक काळांत झाली. त्यावेळीं मालाच्या किंमती चढीच्या होत्या व त्यांस अनुसरून कर्जे देण्यांत आलीं. मंदीच्या कठिण प्रसंगीं ह्या कर्जावरील व्याजाचा हप्ता भरणेंहि आतां शेतकऱ्यांस अवघड झालें आहे. कर्जाचें तारण अपुरें पडलें असून गहाण घेतलेल्या जमिनी विकल्या तरी बँकांचें व्याजहि वसूल होण्याची भ्रांत आहे. कर्जे देण्याचें बंद झाल्यावर बँकेच्या कामांत डायरेक्टर लक्ष घालीनासे झाले. "डायरेक्टर हे काम व सेवा करण्याकरतां आलेले नसून शोषण करण्यासाठीं आले आहेत" अशी एका बँकेसंबंधीं केलेली तक्रार खरी दिसते. पंजाबनें या बाबतींत मद्रासचें उदाहरण नजरेपुढें ठेवलें पाहिजे. तेथें जमीन गहाणाच्या बँकांची स्थापना नव्यानें झाली असून प्रचलित हलके व्याजाचे दर व जमिनीच्या उतरलेल्या किंमती ह्यांनीं बँकांचे व्यवहारांस सुरवात तरी चांगली करून दिली आहे, असा अभिप्राय पंजाबच्या सहकारी खात्याच्या १९३३ चे अहवालांत नमूद करण्यांत आलेला आहे.

कर्जदार शेतकरी आपलीं देणीं भागविण्यास खरोखरच असमर्थ आहे, ही गोष्ट रजिस्ट्रारनेंच स्वतः कबूल केली आहे. हप्ते चुकल्यास, बँकेनें जमीन ताब्यांत घेणें अपरिहार्य होईल, परंतु बँकेस ती विकण्याचा अधिकार दिल्यास, शेतकऱ्यानें सावकाराकडून कर्ज काढणें व बँकेकडून काढणें ह्यांत फरक तो काय राहिला?

## आंतरराष्ट्रीय कामगारपरिषद्

### १९३५ मधील प्रगति

महायुद्धानंतर जो व्हर्सेल्सचा तह झाला, त्या अन्वयें १९१९ मध्यें इंटर नॅशनल लेबर ऑफिसची स्थापना झाली. कामकरी वर्गाच्या बिकट परिस्थितीमुळें असमाधान निर्माण होऊन जागतिक शांतता व एकोपा ह्यांस बाध येतो, म्हणून जगांत कायम शांतता नांदावी ह्या हेतूनें वरील संस्था अस्तित्वांत आणली गेली. राष्ट्रसंघाचे सभासद साहजिकच ह्या संस्थेचे सभासद होतात, तथापि इतर देशांसहि सभासदत्व मिळूं शकतें. सभासद-राष्ट्राच्या दोन प्रतिनिधींबरोबरच प्रत्येकांतील कारखानदार व कामगार ह्यांचा प्रत्येकीं एक प्रतिनिधि परिषदेंत बसतो, हा ह्या संस्थेचा विशेष आहे.

इंटर नॅशनल लेबर कॉन्फरन्सच्या वॉशिंग्टन येथील पहिल्या अधिवेशनांत कामाच्या कमाल तासांची मर्यादा ४८ ही ठरविण्यांत आली, तथापि ह्या निर्णयास कित्येक प्रमुख राष्ट्रांनीं अजून मान्यता दिलेली नाहीं. १९३२ च्या सुमारास जागतिक मंदीमुळें सर्वत्र बेकारी माजली, तेव्हां कामाच्या वांटणींत सर्वांस थोडा फार हिस्सा मिळावा, ह्यासाठी कामाचे तास चाळीसांवर आणावे, ह्या योजनेस कामगारांचा व सरकारी प्रतिनिधींचा पाठिंबा होता; तथापि कामाचे तास कमी झाले, तरी मजूरी पूर्वीची रहावी, ह्या कामगारांच्या मागणीस पुरेसा दुजोरा मिळाला नाहीं. आतां, १९३५ मध्यें, लेबर ऑफिसनें ४० तासांच्या आठवड्यास तत्त्वतः मान्यता दिलेली असून, त्याच्या अंमलबजावणीसहि हळु हळु सुरवात झाली आहे. हें तत्त्व वाढत्या प्रमाणांत लागूं व्हावें अशी येत्या अधिवेशनांत खटपट करण्यांत येईल. १९३५ च्या परिषदेंनें, खाणींमध्यें स्त्रियांस काम करण्याची मनाई, तरुणांच्या बेकारीवर उपाययोजना, कामगारांचें नीट पोषण होत नाहीं त्यावर उपाय; इत्यादि संबंधांत व हंगामी कामगारांचे पन्शनबद्दलचे हक्क ह्यांविषयीं ठराव केले आहेत.

## निवडक बाजारभाव

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर १९३५ पासून ) | ३% |
| ५% (१९४०-४३) ... ... | ११२—० |
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) ... | ११९-१२ |
| ५% ( १९३९-४४ ) लोन ... ... | १०९-१० |
| ४½% लांब मुदत ( १९५५-६० ) ... | ११९—५ |
| ४% १९६०-७० ... ... | ११२—४ |
| ३½% बिनमुदत ... ... ... | ९७-१०½ |
| २¾% १९४७-५० ... ... | १०७—० |
| ४% १९४३ ... ... ... | ११०—८ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) | १०७-१० |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( गॅरंटी व तीन महिन्यांच्या नोटिशीनें परत फेड ) | १०६—८ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... | १०७—० |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बॉंड (७०वर्षें मुदत) | १०७—० |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३-६३ ) ... | ११०—२ |
| ५% म्हैसूर ( १९५५ ) ... ... | १२२—८ |

### मंडळ्यांचे भाग

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( भाग १०० चा, पैकी ५०रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | १३१—० |
| बँक ऑफ बडोदा (१०० पैकी ५० रु. भरले व १०% डिव्हिडंड) | १०५—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५० पैकीं २५ रु. भरले व ६% डिव्हि. ) | ३४-१२ |
| इंपीरिअल बँक (५०० रु., १२% डिव्हि. ) | १५४८-१२ |
| रिझर्व्ह बँक ( १०० रु. ) | १३०—८ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड—बारामती ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ५% ) | ९८—० |
| पाचोरा—जामनेर ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ६% ) | ९५—० |
| अहमदाबाद-प्रांतज ( ५०० रु. चा भाग, डिव्हि. ९¾% ) | ८५२—८ |

#### वीज

| | |
|---|---|
| बॉंबे ट्रॅम्वे ( ऑर्डि. भाग ५० रु. डिव्हि. १३% ) | १५१—४ |
| कराची ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९% ) | २४१—४ |
| पुणें इलेक्ट्रिक् ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९%) | २२३-१२ |
| टाटा पॉवर (१,००० रु. ऑर्डि, डिव्हि. ५½% ) | १५३६—४ |
| टाटा पॉवर ( १,०००रु. प्रेफरन्स, डिव्हि.७½%) | १५२५—० |

#### इतर

| | |
|---|---|
| टाटा आयर्न ( १५० रु. प. प्रेफरन्स डिव्हि. ६% ) | १९३-१२ |
| टाटा आयर्न (१०० रु. द्. प्रेफरन्स, २२रु. ८ आ.) | १६६—८ |
| टाटा आयर्न ( ७५ रु. ऑर्डि. ) | १४३—८ |
| टाटा आयर्न ( ३० रु. डिफर्ड ) | ५२८-१२ |

## अखिल भारतीय ग्रामोद्योग संघ. वर्धा.

### लखनौ येथील अखिल भारतीय ग्रामोद्योग व खादी प्रदर्शन

सदरहु प्रदर्शन ता. २५ मार्चला सुरू होईल व ता. १४ एप्रिल अखेर खुलें राहील. ह्या प्रदर्शनांत महाराष्ट्रासाठीं एक स्वतंत्र स्टॉल ठेवण्यांत आला आहे. प्रदर्शनाकडे जो माल पाठवावयाचा त्यासाठीं जी. आय. पी., एम. एस. एम व नायझाम स्टेट रेल्वे ह्यांनीं सवलत दिली आहे. प्रदर्शनाबद्दल खाली रूपरेषा देत आहे. जास्त माहिती पाहिजे असेल तर प्रदर्शन-चालकांकडे पत्रद्वारें अगर समक्ष चौकशी करावी.

**१ खादी विभाग**

पोट विभाग ( अ ) कापूस व इतर कच्चा माल ( आ ) यांत्रिक विभाग ( इ ) प्रात्यक्षिक विभाग ( ई ) खास प्रदर्शनीय विभाग ( उ ) वस्त्रस्वावलंबन विभाग ( ऊ ) आकडेशास्त्र विभाग ( ए ) खादी बाजार.

**२ ग्रामोद्योग विभाग**

( अ ) खेड्यांतील उद्योग ( आ ) हस्तकौशल्याचीं कामें. ह्या बाबतीमधील मांडणी ( १ ) प्रदर्शनीय विभाग ( २ ) यंत्रें व प्रात्यक्षिक विभाग ( ३ ) आकडेशास्त्र विभाग व ( ४ ) ग्रामोद्योग वस्तुबाजार ह्या वरील सदराप्रमाणें केली जाईल.

**३ शेतकी विभाग**

( १ ) खतें, त्यांचे प्रकार व बनविण्याची पद्धति ( २ ) बीबिआणे प्रकार व नमुने. ( ३ ) यंत्रें, उपकरणें, ( ४ ) गुरें, रोग, किडे ( ५ ) खेड्यांतील जीवन व परिस्थिति. इ.

**४ खाद्यपदार्थ विभाग**

**५ करमणूक विभाग**

**६ कला विभाग**

रेल्वेची सवलतः—प्रदर्शनासाठीं व प्रदर्शनांत विक्रीसाठीं जो माल रवाना होईल तो किंवा ह्यापैकीं उरलेला माल परत आणतांना मोफत पाठविला जाईल. विक्रीसाठीं जे कोणी कांहीं वस्तू पाठवितील त्यांची विक्री प्रदर्शनातर्फे करून देण्यांत येईल व जो माल विक्री होईल त्याचे किंमतीचें शेकडा १० प्रमाणें बटाव ( कमिशन ) घेण्यांत येईल. राहिलेला माल मालकाकडे परत पाठविला जाईल. माल पाठवितांना रेल्वेभाडें व गाडीभाडें वगैरेसाठीं लागणारी रक्कम माल पाठविणारानें अगाऊ भरली पाहिजे. प्रदर्शनाबाबत पत्रव्यवहार व माल रवाना करणें तो, श्री. मंत्री, खादी व ग्रामोद्योग प्रदर्शन, आर्यनगर, लखनौ यांचेशीं करावा.

वैकुंठ एल. मेहता,
सभासद,
व्यवस्थापक मंडळ, अखिल भारतीय ग्रामोद्योग संघ.

S. B. JOSHI & Co.

ENGINEERS & CONTRACTORS

41 A, Bruce Street, Bombay | 716, Sadashiv Peth, Poona City

शास्त्रशुद्ध पायावर काम करणारी, महाराष्ट्राची
प्रमुख प्राव्हिडंड विमा कं.

**दि हिंद बेनिफिट सोसायटी लि.**

च्या लोकप्रिय
प्रपंच पॉलिसीकरितां प्रचारक पाहिजेत.
माहितीसाठीं लिहा.

किताब बिल्डिंग, बुधवार, पुणें. सेक्रेटरी.

आपणांस विहीर बोअर करावयाची आहे काय ?

**भिडे आणि सन्स्**

स्वतः तयार केलेल्या मशीननें बोअर खणून देतात.
चौकशी कराः—
भिडे आणि सन्स्

सांगली ( S. M. C. ) शनीचा पार, पुणें २

**MARATHE & Co.**
**ENGINEERS & IRON FOUNDERS**

WORKS : Natu Bag, Bhikardas Road, POONA 2

Can undertake to do any sort of casting.
We also manufacture WEIGHTS according to the Bombay Weights & Measures Act.
**Our prices are very competitive.**

OFFICE : 978-79, Sadashiv, Laxmi Rd., POONA 2

# CONFIDENCE

is a worth-while asset in business building. The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its

YEARS OF

Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service

HAS CREATED

PUBLIC CONFIDENCE

The following figures will convince you :

NEW BUSINESS
**This year 1934-35**
**Exceeds**
**2 CRORES & 50 LAKHS**

BONUS
PER THOUSAND PER YEAR
On Endowment **Rs. 23** On Whole Life **Rs. 20**

# HINDUSTHAN
**Co-operative Insurance Society, Ltd.**
( ESTD. 1907 )

*Branches* : Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca.
*Offices* : throughout India & the East.

S. C. MAJUMDAR, MANAGER : Bombay Branch. | N. SARKAR *General Manager.*

POONA OFFICE — 180, Budhwar Peth.

# दि डेक्कन पेपर मिल्स कंपनी, लिमिटेड.

रे पेपर मिल, मुंढवा, पुणें. पदमजी पेपर मिल, मुंबई.

पूर्वी आम्हांस लागणारा सर्व कागद आम्ही आपल्या देशांतच तयार करीत होतों, आणि महाराष्ट्रांतील कागदाचा धंदा सुप्रसिद्ध होता.

सध्यांच्या यांत्रिक युगांत, कागदाचे प्रकार आणि त्यांस असलेली मागणी विलक्षण वाढली असतां आम्हीं पूर्ण स्वदेशी कागदच कां वापरूं नये आणि आम्हांस सर्व स्वदेशी कागद कां पुरवतां येऊं नये ?

ह्या प्रश्नांस, दि डेक्कन पेपर मिल्स कंपनीनें, अनेक प्रकारांचा व प्रतींचा कागद आपल्या कार्यक्षम कारखान्यांत तयार करून समाधानकारक उत्तर दिलें आहे.

तुम्हास कसलाहि कागद पाहिजे असो, त्यासंबंधानें खालील पत्त्यावर चौकशी करून तो कागद घ्या.

८१५-१६ भवानी पेठ, पुणें. अहमदाबाद हाऊस, बॅलर्ड एस्टेट, मुंबई.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९३६।३ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२४/१? पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.